संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
12 - MAY 2018
प्राप्त झाले सही ....

**सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.**
**श्रीमती संगिता महाले, लेखाधिकारी.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
**शासन आदेश** :- संलेको-२०१८/ प्र.क्र.३३/कोषा प्रशा -२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २५ एप्रिल, २०१८.

**संदर्भ** :- १) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे यांचे आदेश क्र.ठाजिप्र/जिग्राविय़ं/आस्था-१/ ४७७/२०१६, दि.२७/१०/२०१६,
२) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.संलेको/ रोख/ कार्या-१/रुजू/संमसो/२०१६/४७५/५८६८, दि.१६/११/२०१६,
३) वित्त विभाग, शासन आदेश, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२५२/ कोषा प्रशा-२, दि.२६/१२/२०१६,
४) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/ कार्यमुक्ती आदेश/संम/२०१६/५६६/६६१५, दि.२७/१२/२०१६,
५) पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर यांचे पत्र क्र.पोआ/आस्था-३/२०/ बदली/०७/२०१७, दि.०३/०१/२०१७,
६) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/ रोख/ कार्या-१/ रजा/संम/२०१७/७८५, दि.०५/१२/२०१७,

-: **शासन आदेश** :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखाधिकारी संवर्गातील श्रीमती संगिता महाले, या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे येथे लेखाधिकारी या पदावर कार्यरत असताना, संदर्भ क्र.१ च्या आदेशान्वये त्यांना सदर कार्यालयातून दि.३१/१०/२०१६ (म.नं.) रोजी एकतर्फी कार्यमुक्त केले. त्यामुळे श्रीमती महाले यांना संदर्भ क्र.२ च्या कार्यालयीन आदेशान्वये दि.०२/११/२०१६ (म.पू.) रोजी (दि.०१/११/२०१६ रोजी सार्व. सुट्टी) संचालनालयात रुजू करुन घेतले.

२. तद्नंतर, श्रीमती महाले ह्या पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असताना संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये त्यांना लेखाधिकारी, पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, ठाणे या पदावर पदस्थापना देण्यात आली. त्यानुषंगाने श्रीमती महाले, यांना संदर्भ क्र.४ च्या आदेशान्वये संचालनालय, मुंबई यांनी दि.२७/१२/२०१६ (म.नं.) पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त केले.

३. त्यानुसार, संदर्भ क्र.५ च्या पत्रान्वये श्रीमती महाले या लेखाधिकारी, पोलीस आयुक्त

कृ.मा.प.

कार्यालय, ठाणे या पदस्थापनेच्या पदावर दि.२८/१२/२०१६ (म.पू.) रोजी रुजू झाल्या. दरम्यानच्या कालावधीत श्रीमती महाले या पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असताना त्यांची दि.०३/११/२०१६ ते दि.११/११/२०१६ पर्यंतची ९ दिवसांची अर्जित रजा संचालनालयाने संदर्भ क्र.५ च्या आदेशान्वये मंजूर केली.

४. यास्तव, श्रीमती संगिता महाले यांचा दि.०१/११/२०१६ (०१ दिवस) व दि.१२/११/२०१६ ते दि.२७/१२/२०१६ (४६ दिवस) असा एकूण ४७ दिवसांचा प्रतिक्षाधीन कालावधी नियमित होणे आवश्यक आहे. श्रीमती महाले यांना सदर ४७ दिवसांचा कालावधी पदस्थापनेशिवाय रहावे लागले. त्यामध्ये त्यांचा कोणताही सहभाग नाही.

५. त्यामुळे म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९/ (१४) (फ) च्या तरतूदीच्या अधीन राहून श्रीमती महाले यांना दि.०१/११/२०१६ (०१ दिवस) व दि.१२/११/२०१६ ते दि.२७/१२/२०१६ पर्यंत ४६ दिवस असा एकूण ४७ दिवसांचा कालावधी सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी म्हणून मंजूर करण्यात येत आहे. सदर कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्यास सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, ठाणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शुभांगी शेठ)
सह सचिव, वित्त विभाग.

**प्रत :-**

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.*
३) मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई *
५) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) श्रीमती संगिता महाले, लेखाधिकारी, पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, ठाणे *
७) संबंधित अधिका-याचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
८) संबंधित अधिकारी - वैयक्तिक नस्ती*
९) निवड नस्ती, कोषा प्रशा - २
(संचालक, लेखा व कोषागारे मार्फत)*